महाराष्ट्र शासन
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु),
अधिष्ठाता यांचे कार्यालय, डॉ. ॲनीबेझंट रोड,वरळी, मुंबई ४०० ०१८.
०२२ - २४९३४२१४ फॅक्स . . ०२२ - २४९३६८८१
(website :- www.ayurvedinstitute.com, email :- deanrapmc@gmail.com)

जा.क्र. राआपोम/भांडार/जिवायो २३-२४/२०२४ / 6472 दिनांक :- 06 SEP 2024

**जाहिरात/Notice for Quotation**

प्रति,

....................................

....................................

....................................

विषय:- **दरपत्रक ( Quotation ) सादर करणेबाबत.**
सोबत जोडलेल्या यंत्रसामुग्रीकरीता दरपत्रक सादर करणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ अंतर्गत मंजूर नियतव्ययातून सोबत जोडलेल्या यंत्रसामुग्री खरेदी करणेकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

आपणांस सूचित करण्यात येते की, महाविद्यालयाकरिता यंत्रसामुग्री खरेदी करीता सोबत जोडण्यात आलेल्या विनिर्दिष्टानुसार नमूद यंत्रसामुग्रीचा पुरवठा करणेसाठी कमीत कमी दराची मोहोरबंद पाकिटातील दरपत्रके दिनांक २०.०९.२०२४ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने अधिष्ठाता यांचे कार्यालयात खालील नमूद अटी व शर्ती यांच्या अधिन राहून सादर करण्यात यावीत.

## अटी व शर्ती

१. दिनांक २०.०९.२०२४ रोजी सांय ५.०० वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२. दरपत्रक सादर करताना अशा प्रकारच्या खरेदीवर शासनाकडून आकारले जाणारे विविध कर (taxes) स्वतंत्रपणे नमूद करावेत.
३. दरपत्रक सादर करतेवेळी यंत्रसामुग्री पुरवठा करणेसाठी आपले काही शुल्क/दर असल्यास ते देखिल स्वतंत्रपणे नमूद करावेत.
४. दरपत्रक सादर करताना GST क्रमांक नमूद असलेल्या लेटरहेडवर सादर करावे.
५. ज्या यंत्रसामुग्रीकरिता दरपत्रक सादर करण्यात येत आहे ते I.S.I ( आय.एस.आय) चिन्हाकिंत असेल तर ठळकपणे नमूद करावे.
६. दरपत्रक सादर करणा-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असू नये, तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके

नाकारण्यात येतील. याकरीता सोबत जोडण्यात आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील. **(हमी पत्र विहीत नमुन्यात सादर करावे)**

७. दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रकधारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्सक्ष संबध वा सहभाग नसावा. आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.

८. यंत्रसामुग्री खरेदी प्रश्नात यंत्रसामुग्री करीता देण्यात येणारा हमी कालावधी ( Warranty Period) ठळकपणे नमूद करावा.

९. दरपत्रकासोबत ज्या यंत्रसामुग्रीकरिता दरपत्रक सादर सादर करण्यात येत आहे त्या यंत्रसामुग्रीची विस्तुत माहिती असलेले माहिती पत्रक (Product Catalogue ) जोडावे.

१०. दरपत्रक सादर करतेवेळी मोहोरबंद/सीलबंद पाकिटांवर "........................ **यंत्रसामुग्री करीताचे दरपत्रक"** असे स्पष्टपणे नमूद करावे.

११. खरेदी प्रक्रिया, यशस्वी दरपत्रक स्विकारणाच्या पूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखिल कोणत्याही वेळी लेखी नमूद करावयाच्या कारणांमुळे रदद करण्याचे अधिकार हे कार्यालय राखून ठेवीत आहे.

१२. विहीत कालावधीत प्राप्त दरपत्रके दिनांक २३.०९.२०२४ रोजी स. ११.०० वा. अधिष्ठाता यांचे दालनात उघडण्यात येतील त्यावेळी कंपनीच्या एका प्रतिनिधीस स्वखर्चाने हजर राहण्याची मुभा राहील.

१३. दरपत्रक उघडल्यानंतर आपण सादर केलेल्या यंत्राच्या विर्निदिष्टानुसार ( Specification) सदर यंत्राची प्रत्यक्ष पडताळणी व आवश्यकता वाटल्यास चाचणी महाविद्यालयातील संबधित तज्ञामार्फत करण्यात येईल. त्याकरिता आपण आवश्यक ती व्यवस्था करुन ठेवावी.

१४. पुरवठादाराने सदर खरेदी संदर्भातील आवश्यक माहिती यासोबतच्या प्रपत्रात**(Annexure – B)** मध्ये सादर करावी.

१५. प्रत्येक यंत्रसामुग्री/उपकरणे इ. करिता स्वतंत्र दरपत्रक सादर करावे.

१६. खरेदी प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई हे राखून ठेवत आहेत.

( वैद्या संपदा सं. संत )
अधिष्ठाता
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय(आयु),
वरळी, मुंबई १८.

प्रत,
महाविद्यालयीन सुचना फलक

ANNEXURE -A

जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ अंतर्गत खरेदी करावयाच्या यंत्रसामुग्री/उपकरणे माहिती

| अ.क्र | यंत्रसामुग्रीचे नाव | खरेदी नग | विदिर्निष्टे |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | SWEEPER Machine | 4 | WORKING WIDTH WITH TWO SIDE BRUSHES : 920 MM, DRIVE : MANUAL, CONTAINER CAPACITY : 40 LTR, MAX THEORETICAL AREA PERFORMANCE 3680 m2/hr, Net weight 23.8 kg, DIMENSION: 1300X790X1035 MM. |
| 2 | FLOOR CLEANING MULTIFUNCTION SINGLE DISC | 2 | POWER : 1800 W (2 HP), VOLTAGE : 220V , SPEED : 175 RPM, PLATE DIA. 17", WEIGHT : 50 KG. WORKING WIDTH : 430MM, MOTOR 2.5 HP , 1 PHASE, STRONG HANDLE |
| 3 | PRESSURE WASHER Machine | 2 | WORKING PRESSURE : 150 BAR, MAX PRESSURE : 180 BAR, FLOW : 7.5 LTR/MIN, POWER: 3000 W, INDUCTION MOTOR, BRASS PUMP, 220 V, WEIGHT: 25KG, HOSE PIPE LENGTH : 8 MTR, CABLE LENGTH: 6 MTR, BOX DIMENSIONS : 84 x 36 x 38.5 cm |
| 4 | MULTIPURPOSE TROLLEY WITH WINGER | 4 | Total Height : 110 cm<br>Total Length : 132 cm<br>Width : 75 cm<br>Net Weight / Gross Weight : 15 / 17 kg. |
| 5 | WET AND DRY VACUUM CLEANER | 4 | FUNCTION : WET & DRY, CAPACITY : 30 LTR, POWER : 1100W, 220 V, HEIGHT: 76 CMS, TANK DIAMETER : 345 MM, MODE OF COOLING, CIRCULATING AIR, AIR FLOW RATE : 53 l/s, VACUUM SUCTION : 230 mbar, LENGTH OF THE CABLE : 7 MTR, HOSE DIAMETER : 40 MM, PACKING DIMENSIONS : 43 X 43X 81 MM |
| 6 | 3 CLASSIFICATION BIN WITH WHEEL | 4 | 20 LTR x 3 NOS, Dustbin Grey three compartments red blue yellow according to dry waste bin colours coded.ABS materiel sturdy, With Wheel |
| 7 | 40 LTR 2 BUCKET WINGER TROLLEY | 4 | Wringer Plastic Trolley for floor cleaning with wringer and wheel drive through |
| | | | |

Annexure – B

कंपनीच्या लेटरहेडवर खालील नमूद तपशिलाप्रमाणे माहिती भरणे

प्रति,
अधिष्ठाता,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.),
वरळी, मुंबई -१८

**जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ ( यंत्रसामुग्री )**

............................................................... या साधनसामुग्री करीताचे दरपत्रक

| अ.क्र. | तपशिल | आवश्यक माहिती वा प्रमाणपत्रे जोडण्यात आलेली आहेत किंवा कसे |
|---|---|---|
| १ | पुरवठादाराचे नाव | |
| २ | कंपनीचा पत्ता, दुरध्ववी ई-मेल आयडीसहित | |
| ३ | कंपनीचा नोंदणी क्रमांक ( Registration No.) | |
| ४ | विर्निर्दिष्टे ( सोबत जोडण्यात आलेल्या सहपत्रानुसार) | |
| ५ | GST No. | |
| ६ | शासनाचे कर | |
| ७ | इतर कर | |
| ८ | उत्पादक असल्यास तसे नमूद करावे अथवा प्राधिकृत पुरवठादार असल्याबाबतचे उत्पादक कंपनीचे पत्र | |
| ९ | I.S.O Certification ( आयएसओ चिंन्हाकित आहे किंवा कसे असल्यास तत्संबधीचे प्राधिकरणाकडिल प्रमाणपत्रांची छायांकित प्रत जोडण्यात आली आहे किंवा कसे) | |
| १० | सदर साधनसामुग्रीचा इतर शासकीय/निमशासकीय कार्यालयास पुरवठा केला असल्यास अशा कार्यालयाचे पत्ते व दुरध्वनी क्र. अथवा पुरवठा आदेशांची छायांकित प्रत | |
| ११ | मागील तीन आर्थीक वर्षाचे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले लेख्यांची प्रत सादर करावी ( Profit & Loss Statement, Balance Sheet ), निविदाधारकाचे मागील तीन वर्षाचे उलाढाल प्रमाणपत्र १०० लक्ष असणे आवश्यक आहे. | |
| १२ | हमी कालावधी ( Warranty Period ) | |
| १३ | साधनसामुग्री माहिती पुस्तिका/पत्रक | |
| १४ | हमी पत्र | |
| १५ | इतर अटी व शर्ती असल्यास | |

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

## हमीपत्र - १ ( Undertaking )

मी M/s.................................................................................................

पत्ता :- .....................................................................................................

लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत ........................................ खरेदी करणेसाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असून माझे किंवा माझ्या संस्थेचे खरेदी प्राधिकारी/खरेदी समिती या कार्यालयाशी कोणत्याही प्रकारचे हितसंबध/संघर्ष नाहीत तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :-

दिनांक :-

पुरवठादारांची अधिकृत स्वाक्षरी व शिक्कासह

.....................................................................................................................

## हमीपत्र - २ ( Undertaking )

मी M/s.................................................................................................

पत्ता :- .....................................................................................................

लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत ........................................ खरेदी करणेसाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी/माझी संस्था केवळ एकच दरपत्रक सादर करीत आहे. त्याचप्रमाणे दरपत्रक प्रक्रियेत भाग घेण्या-या अन्य संस्थासोबत माझा/माझ्या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध वा सहभाग नाही तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :-

दिनांक :-

पुरवठादारांची अधिकृत स्वाक्षरी व शिक्कासह